॥

# ग्रंथ विमोचन

## वृंद-वियोग
(संगीतिका)

राजवाडे

(मथुरेत होणाऱ्या चापोत्सवासाठी बलराम आणि श्रीकृष्णाला मथुरेला नेण्यासाठी अक्रूर गोकुळात आला, रथ सज्ज आहे आणि त्यांना ~~रथात घालून~~ घेऊन अक्रूर ~~नि~~ परत निघतो आहे. रथाभोवती गोप गोपिकांचा वेढा पडलेला आहे व्रजवासी त्यांना दुःखित अंतःकरणाने निरोप देत आहेत)

गोपी :- प्रियकर अमुचा श्याम, अक्रुरा नेउं नको मथुरेला !

निवेदक :- धरिति रथ प्रियजन व्रजकुमरी ओढिति धरुनी शेला

गोपी :- रे नेउं नको मथुरेला - अक्रुरा - नेउं नको मथुरेला

निवेदक :- गोकुळजन वृंदावनवासी आळविती अलबेला,
अक्रुरा नेउं नको मथुरेला ।।

कृष्ण :- आई ! आई !

यशोदा :- (त्याला कुरवाळीत) -

नेउं नको गा राजसराणा, माझा छेलछबेला
सोडुनि जाशी सावळिया रे, तुजविण जीव भुकेला !
अक्रुरा नेउं नको मथुरेला

कृष्ण :- रडूं नको आई, आई ग शुभाशीश देई !

यशोदा :- कळला कंसाचा कावा,
मेल्यानं साधला आज असा दावा.
ने हाय कुशीतुनी हिसडुनि मेला
माझा प्राण विसावा

बलराम :- माते आवरि शोक अता

यशोदा :- बाळा बलरामा तूंही आम्हाला विटलास का रे ? मी वेडी, दुष्ट !
तुला किती रे छळलं, म्हणून का मला सोडून जातोस !

कृष्ण :- आई तुझा मार - माझ्या जीवना आधार ग
तुझ्या शिव्यांचा संभार - मला वैजयंती हार.
आई तुझा राग - हासे भाग्य आगोजाग
तुझ्या प्रीतीचे ते सार - करी जगाचा उद्धार
माझ्या मायेचा संसार - झालो आज विश्वाकार

यशोदा :- बाळा दामोदरा -

करकचुनि तुला बांधियले उखळीसी
म्हणुनि का रुष्ट झालासी !

मी माय तुझी दुष्ट घातकी झाले
किति तुजलागी छळियेले
रागाउनि मजवरि बा रे
जातोस सोडुनी का रे
बघ रडते गोकुल सारे
मज नेइ सवे कंसाच्या मथुरेसी
बांधियले तुज उखळीसी.

कृष्ण :- ग रडू नको माय तिथेही आई
यशोदा :- बघ हंबरती रे गायी
अक्रूर :- येउं दे ग माये दीना कदंबाच्या छाये !
त्रस्त जाहली मथुरा आई दीनजनाते छळी
अश्रुजलांनी भरल्या डोही कंस-कालिया बळी
यशोदा :- माझा स्वरूप सावळा, माझा माधव कोवळा
कसा झेपेल ग बाई, नेऊ कोवळ्या अंकुरा
अक्रूर :- कृष्णरूप कलिका नांगी मोडेल सूडाची
कांपे कंस चळचळा येता झेप गरुडाची
कृष्ण :- बघ आई मी अता जाहलो मोठा
यशोदा :- तरि मजसी अजुनी छोटा
ते बाळरूप आठविता
अंगणांत हसता रुसता
विसरेल कशी रे माता
डोळ्यात पहा तरंगती रे अजुनी
तव लीला अंत:करणी.
कृष्ण :- आई ! आई ! नको ग त्या आठवणी !
यशोदा : थेंबा थेंबात साठल्या बाळा तुझ्या आठवणी
दिसते रे माझ्या राजा रूप भरल्या लोचनी
दिन तो आठवला
हृदयी स्मृतिरूपे भरला

तू लहान होतास - मी लोणी काढीत होते. तू मातीनं भरलेला धावत धावत आलास -
घातलीस बाळा गळा कोवळी मिठी
ते रूप मनोहर कधि या पाहिन दिठी
माझं घुसळण थांबलं - तू बलिदादाची फिर्याद केलीस.
म्हणालास -

कृष्ण :- आइ आइ पहा ग हा बलिदादा
मज म्हणतो, तू नव्हे मूल नंदाचा
तुझी नव्हेच आइ यशोदा
होय का ग ?

यशोदा :- (हसत) नाही बेटा।

कृष्ण :- अन् म्हणतो
तू अगदी काळा काळा
अन् नंद यशोदा गोरी
तुज विकत घेतले, मथुरेच्या बाजारी
होय का ग।

यशोदा :- नाही रे माझ्या राजा - नाही.

कृष्ण :- सांगतो बालगोपाळा
हे गेंद्या पेंद्या हसती मजला सारी
चिडविताल ग तिन्तिन्दा
आइ पहा ग हा बलिदादा.

यशोदा :- बरं बरं- त्याचं धर आपण उन्हात बांधू अं।

कृष्ण :- बेडकाची सावली देखील घायची नाही!
तू रागव त्यावर आधी
अन् बोल नको ग अगदी
चांगली जिरव दादाची

यशोदा :- नाही बोलणार - मग तर झालं न!

कृष्ण :- एकटाच खाइन लोणी
हे असे हात मारोनी
टुकटूक करिन मी त्यांना
खुदुखुदु हसत मोठ्यादा
आइ पहा ग हा बलिदादा.

यशोदा :- ही म्हणून लाडी गोडी
करतोस अशी कुरघोडी
धरु नको पदर हा सोडी
लबाडा नाहिस रे साधा (चंद्रावळ येते)

चंद्रा :- हसताना डोळे मोडी- मुकुंदा छान तुझा धंदा

कृष्ण आइ बघ ही आली चंद्रा.

यशोदा :- कोण ग, आलेस चंद्रावळी,
कन्हैय्या खेळ तिच्याजवळी
कृष्ण :- हिजशी केली आम्ही गडी फू
चंद्रा :- फुगडीस हवी का राधा!
कृष्ण :- आइ ही पड्डा ग खोटी चंद्रा.
चंद्रा :- लबाडा मीच खोटी नाही का!
भारी अवखळ तुमचा पोर, फार शिरजोर
करि दह्यादुधाची चोरी!
अम्ही सासुरवाश्या नारी
गोकुळ सोडुनी जाऊ, यशोदामाई.
याच्या या खोड्यापायी
सांभाळा बालमुकुंदा.
कृष्ण :- किति किती ग खोटी चंद्रा!
चंद्रा :- पुन्हा मलाच खोटं म्हणतोस अं लबाडा!
कृष्ण :- तुझ्या सासुनं कशी तुझी खोड मोडली
ते सांग ना चंद्रावळी
चंद्रा :- घेतला आळ सासूनी
की मीच चोरिले लोणी
ही तुझ्या मुलाची करणी
मारवले हात ग दोन्ही
लाविले गाला
हा छळतो मेला काळा
हळुच येउनी, एकली बघुनि
करित धरधंदा
कृष्ण :- करि खुशाल माझ्या निंदा
पण खोटी ती खोटी चंद्रा
यशोदा :- मी तुझा साळसूदपणा (चांगला) ओळखते कृष्णा! (चंद्रा) चोरच्या चोर वर शिरजोर
तुला चांगलीच अद्दल घडवते थांब!
कृष्ण :- शपथ आइ मी न चोरिले लोणी.

नाही ग आइ मी न चोरिले लोणी ।
नाही लाविला हात मुळी ग पाहिले न भुरकोनी
उंच शिंकाळी हात पुरेना टाचा उंचावोनी ॥ शपथ आइ
असेल आई काळा बोका - घरात ये चोरोनी
मिशि पुसतांना तया पाहिलें जातां दूर पळोनी ॥ शपथ आइ -
आळ आणिसी उगाच मजवर, दादाला सोडोनी
मुळी धायचें संन्यासाला - चोरा देउनि लोणी ॥ शपथ -
म्हणसि एरवी उगाच वरवर 'छकुली माझी सोनी'
लटके सारे कळलें मजला, तुझा नव्हे मी कोणी ॥ शपथ आई

यशोदा :- हा छंद तुझा पाहुनिया हृषिकेशी
बांधियले तुज उखळीसी.

कृष्ण :- ते बंधन गे आणिल ओढुनि मागे
मथुरेस जाउ दे वेगें
बंधनी देवकी माता
दास्यांत बुडाली जनता
ती मातृभूमि उद्धरिता
दे धीर मला बंधन ते तोडाया
या बंधनात परताया

नंद :- तुटती नच प्रेमबंध गोकुळास सोडुनी
जोडिशील बंध नवे दास्यबंध तोडुनी
जा बाळा बलिभद्रा - श्रीकृष्णा सांभाळी
यशोदा :- अल्लड तो हूड तया प्रेमाने कुरवाळी
(दोघेही नंद यशोदेला नमस्कार करतात)

नंद यशोदा :- 'सुखी रहा सुखी रहा'

निवेदक :- मायेने चुंबियले
गौर नील राजहंस मंद मंद चालले
गोकुळा उभा लाडके सौंगडी
म्लानतेची शिरी घेउनी घोंगडी

गोपी :- करत्व गाळी अश्रुफुलांचे - पूर येइ यमुनेला
अक्रुरा नेऊ नको मथुरेला
(१ला भाग -)
(दृश्य बदल)

 

निवेदक :- अम्बरश्री धरोनी उभ्या गोपिका
रथपथी आडवी लोळते राधिका
कृष्ण येई तिथे बोलला 'राधिके-
राधिके काय हे सांग प्राणाधिके'

राधा :- करयुगुलांनी चरण चेपितां झाले रे धन्य !
तुडवितील ना तीच पाउलें आज होति अन्य

कृष्ण :- ऊठ ऊठ राधिके, सोडि वाट प्रेमले
प्रेम काय संपते चंद्र चांदण्यातले ?

राधा :- थयथयते हय न्यावे हृदयावरुनी राया
तुजसाठी तळमळते मन माझे चुरडाया

कृष्ण :- अडवु नको सोडि वाट जाऊं दे मथुरेसी
भलते हे वेड तुवां लावियले हृदयासी

राधा :- असंख्य राधिका तुला, कृष्ण एकला मला
नभांत तारका किती, तयास चंद्र एकला

कृष्ण :- आला भरोनिया डोळा आसवांचा मेघ
विरहांत प्रीत तुझी बिजलीची रेघ

राधा :- नका पाहू घननीळा आसवांचा मेळ
दूरावल्या अंतरांत पारखांचा खेळ

कृष्ण :- तीर परतीरी उभे हे जीव जीवा पारखे
अंतरंगी प्रीत गंगा -

राधा :- तूं कुठे अन् मी कुठे !
जाहल्या ताटातुटी काळीज माझे हे तुटे
सोसवेना रे जिणे हे - तूं कुठे अन् मी कुठे !

कृष्ण :- आसवांची निळी सारणी
कसा जाईन ओलांडुनी

राधा :- नाव सोडा तिथेवर, कापून अंतर, नकाच माया धरू
जिवलगा नावानं आम्ही तरू.

कृष्ण :- पूस वेडे आसवे ही, जाउं दे माझ्या फुला
राधा :- वैजयंतीतील हे निर्माल्य फेकी बाजुला.

कृष्ण :- ग ऊठ राधिके ऊठ,
धुळीनें अंग तुझे भरले
राधा :- ही उटी मातिची बरी
अतां ते केशर नच उरले
कृष्ण :- विखुरले केस बघ मीनलोचनी अश्रू सळसळले
राधा :- ये हृदय सख्या बाहेर - बघाया विरहें विरघळले
चंद्रा :- लाविली माया कशाला - सांग जीवा जोडुनी
आणि का रे निर्दया हे बंध सारे तोडुनी.
राधा :- ऐसाचि रहा, जाउं नको
नयनांचे सुख, तुझें कमलमुख
त्यास विमुख मज करू नको ॥ ऐसाचि रहा ॥
चंद्रा :- तुझें दूरपण हृदय विदारण
मीन जलाविण मारू नको ॥ ऐसाचि रहा ॥
भाव सुमन सुखशेज पसरली
मोकलुनी तिज सुकवु नको ↓
राधा :- सख्या सुंदरा, नयन-चकोरा
इंदुदर्शना मुकवुं नको
हास्य मुरलीचे, लास्य नयनिंचे
पाडु दे ते लपवुं नको
बोलु कुणाशी पाहु कुणाला !
आग जिवाला लाऊं नको ॥ ऐसाचि रहा (अक्रुर येतो)
अक्रुर :- देवा, आता निघायचं .
राधा :- अक्रुरा नेलोस क्रूरा श्याम माझा ओढुनी
जा सुखे जा सांग कंसा नाटले वृंदावनी
निवेदक :- चंद्रावळही गौळण राधा गुंफिति कर कमरेला
गोपी :- अक्रुरा नेउं नको मथुरेला
अक्रुर :- मी कंसाचा दास, राधिके करू नको उपहास
जीभ न माझी, निरोप त्याचा मी काळाचा घास
अभागिनी ही मथुरानगरी परवशाला वनवास
राधा :- वनवासी मग कशास नेता वृंदावनची आस .
नेता त्राता कृष्ण एकला हतभागी जीवास
अक्रुर :- जनतेचा हा एक जनार्दन करिल बंदीनाश
राधिके, मन हे होय उदास - करू नको उपहास

राधा :- तारिले गोकुळा स्वयें बुडोनी डोही
जा शोकसागरीं आज बुडवुनी तेंही
लटकीच लाविली माया
शेवटीं असे बुडवाया
तुज काय तयाचें खुशाल आता जावे
ते दिवस प्रीतिचे वृंदावन विसरावे

कृष्ण :- कां आळ असा घेसि राधिके लटका
हृदयास लाविसी चटका

राधा :- त्या आणा शपथा लटक्या
आम्हीच कपाळीं फुटक्या
प्रीतिच्या वाजवुनि चुटक्या
ते चुटक्यांचे मांडव मोडुनि जाशी
भुलविलेस व्रजबालासी !

कृष्ण :- विसरू जरि तुला,
आठव तव विसरताहे सोडिना मला.

राधा :- खोटं सारं खोटं - ब्रिजलाला !

विसरशील खास मला दृष्टिआड होता
वचनें ही गोड गोड देशी जरी आता !
दृष्टिआड झाल्यावर सृष्टिही निराळी
व्यवसायहि विविध विविध विषय भोवताली
गुंतता तयांत कुठें वचन आठवीता ! ॥१॥
स्वैर तूं विहंग अंबरांत विहरणारा
वशहि वशीकरण तुला सहज जादुगारा
रमशिल रमवीत कुणा येशि कसा हाता ॥२॥
मादकचल नयनांतिल वारुणी पिशील
मृदुतर भुजकुंजवनीं फसुनि गुंतशील
लाभशील माझा मज केंवि जसा होता ॥३॥
विंधाया टपले रे भवति शर विषारी
वेधितील लक्ष्य तुला करुनिया जिव्हारी
काहीं कुठें कुठें होता तुज कोण सोडवीता ! ॥४॥
स्वत्वाचे भान जिथें गुंतल्या नुरावे
झुरणारें हृदय तिथें हे कुणी स्मरावे
होइल परिहास खास आस धरू जाता ॥५॥
अंतरिची आग तुला जाणवू कशानें !
बोलवे न वेदनेस वदन दुःख मेणे
या परता दृष्टिआड होउ नको नाथा ॥६॥

कृष्ण :- हें हृदय चिरुनि दावु का
दिसति रुधिरकणकणांत भरली, ही भोळी राधिका !

राधा :- भूषविसी हृदयाचा ऐनेमहाल श्याम
कितीतरी प्रतिबिंबें तुझी ब्रिजलाल !
पण आज –
ऐन्याला पडला चिरा
कसें पाहु मी रूप मनोहर तुझे श्यामसुंदरा.

कृष्ण :- वेडी, माझी भाग्याची वेडी !

राधा :- तूंच हे असे.
प्रथम लाविलेस मला, आपुले पिसे
आणि निर्दया
चुरुनि हृदय आज असा जासि निघुनिया

कृष्ण :- कशि ग समजाविशि मी करू
प्रीतिचा सिंधु न होय रिता

राधा :- मिळतिल तिथेंहि किति सरिता.

कृष्ण :- चाललो जरी मी आज गोकुळांतून.
त्वरित गे परत येईन

राधा :- श्यामा, प्रियकरा–. खरंच का हे ?

कृष्ण :- कंठाची शपथ !

राधा :- विवश वासना
काय करू नावरेच सुरत दर्शना

कृष्ण :- राधे, जनप्रीतीसाठी तुझी माझी घडे तुटी
वेडे, जनसेवेत –
जाळोनि स्वार्थ सरवये ठरू ये कृतार्थ

राधा :- हा स्वार्थ, हा मोह मला सुटत नाहीं रे
पाहु दे दिठी, रूप एकवार कंठि घालु दे मिठी
जीव मग सुखे राहु दे जाउ दे. दोन्ही सारखे.

कृष्ण :- इरवाद सोड सखि जाउं दे
स्वातंत्र्य समर मधुपुरी धडकता त्यात उडी मज घेउं दे.
माया ममता लोभ जिव्हाळा
सोडुनि जातां प्रिय गोपाळा
स्वर्ग प्रीतिचा तुवां निर्मिला
जन्मभूमि ही जननी माझी -डोळा भरुनी पाहु दे.

'बंदिवासिनी माय- देश ना
टाकु तोडुनि दास्यबंधना
स्वर्ग प्रीतिचा उणा त्याविना
स्वतंत्रतेच्या सौख्य सागरी भारतीय जन न्हाउ दे ॥२॥"

राधा :- जा देवा जा, तुझ्या या शुभकार्यांत मी आडवी आले, कित्ती रे वेडी मी, - पण श्याम मन मानत नाही रे, मला ही ने ना आपल्या सोबत :-

कृष्ण :- छे. छे! तुझं गोकुळ तुझ्या शिवाय सुन राहिल राधे! तूं इथंच रहायला हवंस! कृष्ण तुझ्या दूर नाही राधे!

राधा :- ठीक आहे!

दैवि जे असे असुनि नाथ मी अनाथ होउं दे तसे
दिवस यामिनी, सारिन यापुढति तुझ्या रूपचिंतनी
सहज कधितरी, आले तर येऊ दे स्मरण अंतरी
आणि केधवा यावेसे वाटल्यास येइ तेधवा
तववरी इथें पायांची चाहूल मी बघत राहते
हृदय मम उले, उलु दे परि शिणवुं नको मृदुल पाउले
दैवयोग हा, मी झुरेन, मी मरेन तूं सुखी रहा.

कृष्ण :- भोळी, माझी मुलखाची भोळी!, राधे, जाऊं मी!

राधा :- जा रे जा जादुगारा - --

कृष्ण :- बोल खोटे कापऱ्या ओठावरी

राधा :- जा कुठेही चित्तचोरा जा सुखे -
पण माझं एकच मागणं आहे ब्रिजलाल

कृष्ण :- काय ते!

राधा :- मुरलीधर प्राण विसावा
जातोस सोडुनी देवा
कधि तुझा न विसर पडावा.
तव आठवणीचा ठेवा
ती प्रीति भेट मज द्यावी - चुंबने भरली
रसवंती ही तव मुरली!
विरहांत एक ही आशा
की मूर्तिमंत अभिलाषा
विसरांत प्रीतिची भाषा
बोलाया जवळी उरलि, मनीं या भरली
रसवंती ही तव मुरली.

कृष्ण :- घे तुला लाडकी वेणू
नादवी सकल अणुरेणू "
हंबरती ऐकुनि धेनू
ही अखेर धरुनी ओठी - वदे जगजेठी
घडवीत स्वरांच्या भेटी

राधे ! जिचा उगम आणि विकास इथेच झाला. ते हे नादब्रह्म गोकुळाची अमोल ठेव तुझ्या हाती देण्यात केवढा आनंद होतो आहे मला ! .(ही घे तुझी वेणू)- कृष्ण राधेला मुरली ची भेट देतो) या गोकुळाच्या चंद्रावन परिसरात - कालिंदी पुलिनावरच हे नादब्रह्म निनादायचे ! गोकुळ सुरमय आहे तेंडे मथुरा असुरमय !

निवेदक :- आसवे सराले, उराशी धरली,
सखि राधा अधरी हसली
बोलला कृष्ण अनुरागे जाता जाता -

कृष्ण :- राधिके संभाळ वेणू ती उराशी लावताना
पालटे काया क्षणी त्या वेणुची होईल वीणा

राधा :- चुंबिली वेणू सदा - वीणारवा ना अंतरावे
तंतकारा छेडण्याते दूरचे हे हात यावे .

कृष्ण :- (हसत) राधे सोड ही मिठी

राधा :- जाशि करांतुनि, जाशि घरांतुनि
हृदयातुनि परि जाउ नको ! ,,ऐसाचि रहा "

(श्रीकृष्ण बलराम रथातून निघतात)

निवेदक :- गेला चुरडित रथ पथि पडला वन सुमनांचा झेला

गोपी :- अक्रूरा नेउ नको मथुरेला . (राधा जाल्या वाटेकडे टकलाऊन पहात आहे)

चंद्रा - चुरिले जे चरण तेच चुरति आज उर
नेइ क्रूर अक्रूर हा कृष्ण दूर दूर

निवेदक :- रडुनि रडुनि वाट भिजे धूळ उडेना पाही
दूर दूर रथ जाता - दृष्टि पडेना कांही

गोपी :- येइल का कधि परत गोकुळी :- हंस उडोनी गेला
अक्रूरा - नेऊ नको मथुरेला .

राधा :- घे मला परवात माझ्या पारवरां '
पोचवी संदेश त्याला दूतिके
परत ये परत ये जिवलगा परत ये !